सत्यमेव जयते

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी),पुणे

## (महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)

## २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे ४११००१

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF) - २०१८

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आर्थिक, सामाजिक प्रतिकूल परिस्थितीवर मात करून उच्च शिक्षणासाठी १०५ वर्षांपूर्वी सन १९१३ साली कोलंबिया येथे प्रस्थान केले होते. या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ बार्टी मार्फत सन २०१३ पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF) सुरु करण्यात आली. त्या अंतर्गत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीतील एम.फिल./ पी.एच.डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांना संशोधनाकरिता प्रोत्साहन व आर्थिक सहाय्याच्या स्वरुपात अधिछात्रवृत्ती देण्याकरिता ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

### अधिछात्रवृत्ती संख्या व आरक्षण

| प्रवर्ग | एम.फिल. | पी.एच.डी. | एकूण |
|---|---|---|---|
| महिला (५०%) | २१ | ३२ | ५३ |
| सर्वसाधारण पुरुष व महिला | २० | २९ | ४९ |
| दिव्यांग (३ %) | ०१ | ०२ | ०३ |
| **एकूण संख्या** | **४२** | **६३** | **१०५** |

### पात्रता

१. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी व अनुसूचित जातीचा असावा.
२. दि.२० जुलै २०१७ ते १० डिसेंबर २०१८ या दिनांकाच्या दरम्यान संबंधित विद्यापीठ / संस्था यामध्ये नोंदणी असलेले विद्यार्थी अधिछात्रवृत्तीसाठी ऑनलाईन अर्ज करण्यास पात्र असतील.
३. दि.१० डिसेंबर २०१८ रोजी अर्जदाराचे वय ४० वर्षांपेक्षा अधिक नसावे.
४. अर्जदाराच्या कुटुंबाचे एकूण वार्षिक उत्पन्न रु. ६ लाखापेक्षा जास्त नसावे.

### अधिछात्रवृत्ती योजने अंतर्गत देण्यात येणारे लाभ

१. निवड करण्यात येणाऱ्या अर्जदारांना एम.फिल. करिता २ वर्ष किंवा त्यांच्या विद्यापीठाने निर्धारित केलेल्या शैक्षणिक कालावधीसाठी रु.२५,०००/- प्रति महा या प्रमाणे अधिछात्रवृत्ती रक्कम अदा करण्यात येणार आहे.
२. पी.एच.डी. करिता पहिले दोन वर्ष (JRF) रु.२५,०००/- प्रति महा प्रमाणे व उर्वरित एक वर्ष (SRF) रु.२८,०००/- प्रति महा या प्रमाणे अधिछात्रवृत्ती रक्कम अदा करण्यात येणार आहे.
३. शासकीय नियमानुसार घरभाडे भत्ता, आकस्मिक खर्च इ. बार्टी मार्फत देण्यात येईल.

### अटी व शर्ती

१. अधिछात्रवृत्ती (BANRF) - २०१८ करिता निवड करण्यात येणाऱ्या विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती अंतर्गत दिले जाणारे सर्व लाभ संबंधित विद्यापीठ/ यामधील नोंदणी / रुजू दिनांक (Date of Registration ) पासून लागू होतील.
२. प्रस्तुत BANRF -२०१८ करिता फक्त ऑनलाईन पद्धतीने अर्ज स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.
३. विद्यापीठ / संस्था यामध्ये नोंदणी नसलेले अर्जदार (Not Registered Candidates) किंवा या अगोदर बार्टी अधिछात्रवृत्ती अंतर्गत लाभ घेतले असल्यास BANRF -२०१८ करिता अर्ज करण्यास पात्र नसतील.
४. **पात्र अर्जदारांनी ऑनलाईन अर्ज https://barti.maharashtra.gov.in>Notice Board>Online Application for BANRF- २०१८ या वेबसाईटवर दिनांक १९/११/२०१८ रात्रौ ००:०१ वा. ते दिनांक १०/१२/२०१८, रात्रौ २३:५९ वाजेपर्यंत या कालावधीतच सादर करणे अनिवार्य राहील.**
५. अर्जदारांकरिता ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना, मार्गदर्शक तत्वे बार्टीच्या https://barti.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.
६. ऑनलाईन अर्ज सादर करताना किंवा संपूर्ण निवड प्रक्रियेच्या दरम्यान कोणत्याही टप्प्यावर चुकीची माहिती सादर केल्यास प्रस्तुत अधिछात्रवृत्ती (BANRF) -२०१८ व यापुढील सर्व निवड प्रक्रियेसाठी अर्जदारास अपात्र ठरविण्यात येईल.
७. उपरोक्त नमूद केलेल्या अधिछात्रवृत्ती संख्या, आरक्षण, अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे संपूर्ण अंतिम अधिकार महासंचालक, बार्टी यांनी राखून ठेवलेले आहेत.

**ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना काही तांत्रिक अडचणी आल्यास टोल फ्री हेल्पलाईन क्रमांक १८००२३३०४४४ सकाळी ०८:०० ते रात्रौ १०:०० वाजेपर्यंत संपर्क साधावा.**

Email- Fellowship@barti.in Website: http://barti.maharashtra.gov.in www.barti.in | /BARTIConnect | /BARTIConnect

ADVT/FELLOWSHIP/१९-११-२०१८/३७

**कैलास कणसे** (भापोसे)
महासंचालक,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था(बार्टी), पुणे